कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/९७७ /२०२६ दि. ०३/०९/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, कासारवडवली वाहतूक उपविभागाचे हददीत दिनांक ०५/०९/२०२६ रोजी नवयुग मित्र मंडळ, टिकुजीनीवाडी, कोठारी कम्पाऊड, मानपाडा यांच्या वतीने हॅपी व्हॅली चौक येथे **'दहिहंडी'** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या निमित्त सदर ठिकाणी नागरिक मोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही. ए./११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

प्रवेश बंद – १) खेवरा सर्कल कडुन हॅपी व्हॅली कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मुकेश स्टोअर समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – खेवरा सर्कल येथुन हॅपी व्हॅली कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना हॅपी व्हॅली कडुन खेवरा सर्कलकडे येणारी वाहीनी मुकेश स्टोअर पावेतो दुहेरी करण्यात येत असुन सदर वाहीनीवरुन इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसुचना दि.०५/०९/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते रात्रौ २२.०० वाजेपावेतो लागू राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, रूग्णवाहीका, फायर ब्रिगेड व अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर :–

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/ वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे
नियत्रण कक्ष आधिकारी, ठाणे
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी
प्रत :– सपोआ ठाणे/वागळे वाहतूक विभाग, पोनि. कासारवडवली, कापुरबावडी, वागळे वाहतूक उपविभाग ठाणे शहर

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner